पारावरच्या गप्पा

# शेतीचा वीजपुरवठा ठरतोय शेतकऱ्यांची डोकेदुखी!



नित्यनियमप्रमाणे देवदर्शन आटोपून संपत पारावर येऊन बसला होता. गणपतला आज जरा उशीरच झाला होता. घाईघाईत देवदर्शन घेऊन गणपत संपतच्या जवळ येऊन बसला. परंतु तो आज काहीतरी चिंतेत दिसत होता. संपतने गणपतचा चेहरा वाचला आणि हळूच म्हणाला, ''कारं गंपा, काही टेन्शन वगैरे आहे काय? फारच चेहरा पडलेला दिसतो.''

त्यावर गणपत म्हणाला, ''तसं काही नाही रे संपा, दररोजचेच आहे हे. आज घरी किरकिर झाली, सकाळी सकाळीच विहिरीतून पाणी उपसून गायींना पाजावे लागले. आठ दिवस झाले डीपी जळाली. ती अजून नीट होईना. लाईटबिल भरा, थकबाकी भरा, यात चार दिवस गेले. पैसे गोळा करून भरले तरीही डीपी चालू करून देईनात. डीपी नीट करायला परत पैसे गोळा केले. तरीही अजून डीपी नीट होईना. चार- पाच दिवस काढले कसेतरी. घरातही पाण्याचा तपास नाही. आपल्याकडे लाईटचे म्हणजे 'असून ताप- नसून संताप'. डोक्याचा पार भुगा झाला. घरातही त्यामुळे वाद झाले.''

संपतने हळूच गणपतच्या पाठीवर हात ठेवला व म्हणाला, ''आरं गंपा, हे काय आपल्याला नवीन आहे काय? 'रोजचं मढं त्याला कोण रडं' अशी गत झाली बघ आपली. लाईट आहे तर कमी व्होल्टेजमुळे मोटर चालत नाही. मोटर चालली तर डीपीची फ्यूज-लिंक गेली, इकडून तिकडून मोटर चालली तर शेतात पाणी जाईपर्यंत लाईटने झटका मारलाच समजा. उन्हाळ्यात पिकाला पाणी जास्त लागतं त्यावेळी विजेची कपात होते, मोटरी चालत नाहीत, कमी व्होल्टेजवर मोटरी चालल्या तर त्या जळतात. अशा अनेक समस्या. डीपीचे ऑईल संपले- काढा वर्गणी, डीपीचे कटाऊट- लिंक किंवा काही सामान आणायचे- काढा वर्गणी, विजेच्या खांबावरील तारा लटकल्या- काढा वर्गणी. वीज मंडळाच्या कार्यालयात तक्रार करावी तर त्यांच्याकडे बजेट नाही, साहित्य नाही. एवढेच काय तर त्यांच्याकडे डीपीवरचा फेज टाकायला, लिंक टाकायला सुद्धा माणसे नाहीत. आपणच आपला जीव धोक्यात घालून त्या गोष्टी करायच्या. बरं एवढं होऊनही लाईट दिवसा कधी चांगली चालत नाही आणि रात्री चालली तर जंगली प्राण्यांच्या भीतीमुळे शेतात जाता येत नाही. या सर्व संकटांवर मात करून आपण आपलं काम करत

राहायचं. रडत बसून काहीही उपयोग नाही बघ गंपा.''

यावर चिडून गणपत म्हणाला, ''मग काय करायचं संपा? जीव द्यायचा काय या लाईटपुढे? या सर्व समस्या आपल्या मायबाप सरकारला दिसत नाहीत काय? आमदार- खासदार, मंत्री मोठमोठ्या गप्पा मारतात. त्यांना हा लाईटचा प्रश्न सोडविता येत नाही काय? आश्वासन देतात, वीजमाफी करू सांगतात, शेतीला वीज मोफत देऊ असे सांगतात, शेतकऱ्यांना आम्ही वाऱ्यावर सोडणार नाही अशा वल्गना करतात. मतं मिळाली- निवडून आले की नंतर सर्व विसरून जातात. संपा, खरंच हा विजेचा प्रश्न सुटणार आहे की नाही? की असाच चालू राहील? हा प्रश्न सुटला नाही तर मात्र आपल्या सहनशीलतेचा बांध फुटायला बसला बघ संपा.''

यावर हसून संपत म्हणाला, ''मला तर वाटतं सरकारला विजेचा प्रश्न सतत भिजत ठेवायचा आहे. कारण प्रत्येक राजकारण्याला, पक्षाला निवडणुकांसाठी काहीतरी प्रश्न मांडावा लागतो आणि तो आम्ही कसा सोडवणार यावर भाषणे करून मते मागायची असतात. वीजमाफी, कर्जमाफी हे गेल्या किती इलेक्शनपासून सुरू आहे तुला तर माहीतच आहे. खरं तर ही वाईट सवय आपल्याला या राजकारणी लोकांनी लावली आहे. शेतकरी हा स्वाभिमानी आहे. त्याला कोणाचेही कर्ज किंवा कोणाचीही बाकी थकवायची नसते. परंतु राजकारण्यांनी दाखविलेल्या गाजरामुळे आपण त्याच्या आहारी गेलो आहोत. शेतकरी कधीच म्हणाला नाही मला वीज मोफत द्या म्हणून. तुम्ही शेतीमाल ग्राहकांना स्वस्तात मिळावा म्हणून शेतीमालाचे भाव नियंत्रणात ठेवता, त्यामुळे महागाई वाढत नाही. म्हणजे शेतकऱ्यांनी केलेल्या खर्चाचा तुम्ही योग्य मोबदला देत नाही. म्हणून याचा विचार करून तुम्ही शेतीची वीज नाममात्र मोबदल्यामध्ये उपलब्ध करून द्या. पिकाच्या गरजेनुसारच पाणी देण्यासाठी त्याला पाहिजे त्यावेळी, दिवसा व योग्य त्या दाबाने विद्युत पुरवठा करा. २४ तास लाईट देऊच नका. फक्त ८-१० तास लाईट द्या, तेही दिवसाच. विजेचे बिल भरले नाही तर लाईट बंद करा परंतु वीज देताना डीपी किंवा इतर सेवाही योग्य पद्धतीने द्या. यासाठी शेतकऱ्यांना वर्गणी काढायला लावू नका. खरं तर या सर्व गोष्टींची सवयच आता वीज मंडळाच्या कर्मचाऱ्यांना राहिलेली नाही. ज्याप्रमाणे शहरामध्ये, औद्योगिक वसाहतींमध्ये जबाबदारीने वीजपुरवठा सुरू ठेवला जातो, त्याप्रमाणे ग्रामीण भागातही विशेषत: शेतीसाठी वीजपुरवठा सुरू ठेवण्याची जबाबदारीही वीज मंडळावर असते याचा जणू विसरच पडलाय त्यांना.

यावर गणपतने संपतचा हात हातात घेतला व तो म्हणाला, ''अगदी बरोबर बोलतोय बघ संपा. आपली त्यांना काही किंमतच राहिली नाही. आपण वीज चोरतो असे ते म्हणतात. आपण लाईटबिल भरत नाही, वीज महामंडळ कर्जबाजारी झाले अशी त्यांची ओरड असते! खरे तर आपण जगाचे पोशिंदे. आपण रात्रंदिवस कष्ट करून, जीव धोक्यात घालून ही आतबट्ट्याची शेती पिकवायची. निसर्गाच्या लहरीपणामुळे तसेच बाजारभावाच्या चढउताराच्या या जुगारात आपण आपला पैसा शेतात टाकतो आणि जे येईल ते समाजाच्या ताटात पोहोचवतो याची जाणीव त्यांना नाही. बँक आपल्याला कर्जबुडवे म्हणते, वीज मंडळ वीजचोर म्हणते, बिल थकलेय म्हणते. खरंच कधी कधी आपल्याला आपलाच राग येतो. पण जो शेतीधर्म आपण पत्करला आहे तो सोडायचा नाही किंवा आता दुसरा मार्गही आपल्याला उरला नाही, म्हणून शेती करायची, बाकी काय!''

यावर हसत संपत म्हणाला, ''ठीक आहे रे गंपा. हेही दिवस निघून जातील. निघेल यातून काहीतरी वाट. होईल काहीतरी आपल्या फायद्याचे. निराश होऊन प्रश्न सुटत नसतो, त्यासाठी प्रयत्न करायला पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण नको त्या गोष्टींची चर्चा करतो, माहिती काढत असतो. परंतु ज्या बाबी आपल्या उद्योगधंद्याविषयी म्हणजे आपल्या शेतीविषयी आहेत त्याकडे आपण जास्त लक्ष देत नाही. त्याची माहिती घेत नाही किंवा माहिती घेण्याचा प्रयत्नही करत नाही. आता लाईटचेच घे ना. वीज मंडळ म्हणते शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात

बिल थकीत असल्यामुळे वीज मंडळ तोट्यात आहे. सरकार म्हणते शेतकऱ्यांना कमी दरामध्ये दिलेल्या विजेचे अनुदान वीज महामंडळाला दिले. शेतकऱ्यांचे पैसे थकीत असतील तरीही सरकार वीज मंडळाला मदत करते. मग नेमके वीज मंडळ कोणामुळे थकीत आहे याची माहिती काढण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. विजेची जी चोरी होते तिचे प्रमाण ३०-३५ टक्क्यांपर्यंत आहे, असे बोलले जाते. या चोरीच्या विजेची रक्कम शेतकऱ्यांच्या थकबाकीत टाकली जाते. मोठ्या कंपन्या, घरगुती लाईट तसेच सरकारी कार्यालये, यंत्रणा यांच्याकडे किती वीज बिल थकीत आहे यावर चर्चा होते काय? सर्वात महत्त्वाचे म्हणजे शेतकरी पावसाळ्यात मोटर वापरत नाही कारण पाऊस असतो. थंडीत पिकांना कमी प्रमाणात पाणी लागते, त्यामुळे तो कमी वीज वापरतो. उन्हाळ्यात पिकाला जास्त पाणी लागते परंतु त्यावेळी एक तर विहिरीत पाणी नसते आणि असलेच पाणी तर लाईट नसते. वीज मंडळ शेतकऱ्यांकडून वर्षभराचे बिल घेते परंतु दररोज ८ तासांपैकी किती तास मोटार चालते याचा विचार होत नाही. या सर्व बाबींची माहिती घेऊन, आकडेवारी घेऊन आपले लोकप्रतिनिधी- आमदार- खासदार- मंत्री यांना याचा जाब विचारणे गरजेचे आहे. त्यांनी या प्रश्नांची उत्तरे आपल्याला दिली पाहिजे किंवा अधिवेशनामध्ये यावर चर्चा करून त्यावर मार्ग काढला पाहिजे. अर्थात यापुढे या गोष्टी कराव्याच लागतील किंवा केल्या जातील. शेतकरी आता विजेच्या बाबतीत शांत बसणार नाही कारण शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत होत चालला आहे. म्हणून तुला सांगतो गंपा, हे प्रश्न सुटणार नसतील तर आपण सर्व एकत्र येऊन ते सोडविण्यासाठी या मंडळींना भाग पाडू. शेतकऱ्यांनी तरी किती दिवस या गोष्टी सहन करायच्या?''

खरं तर संपतच्या या बोलण्यावर गणपत एकदम खूष दिसत होता. तो म्हणाला, ''यार संपा, तुझं हे सर्व ऐकून मला तर तू शेतकरी संघटनेचा कार्यकर्ता वाटायला लागला. तेही असेच बोलतात. पण आपणच बावळट आहोत. आपल्यालाच आपल्या हक्कांची जाणीव नाही. कोणीतरी जाणीव करून द्यायचा प्रयत्न केला तर ऐकून सोडून देतो. पण संपा, तू सांगितल्याप्रमाणे आता मात्र आपण आपल्या हक्कांसाठी लढले पाहिजे. हे लढणे म्हणजे फक्त रस्त्यावर उतरून नाही तर त्या विषयाचा सर्व बाजूने अभ्यास करून त्याची माहिती, आकडेवारी घेऊन आपणही संबंधितांना जाब विचारू. चला आता पुढचे पुढे पाहू. पहिले डीपीचे काम करून घ्यावे लागेल. नाहीतर शेतात पिकाला पाणी नाही आणि घरीही जेवायला मिळणार नाही. सकाळी बिनचहाचा आलोय मी. चल संपा, एक स्पेशल चहा पाज...'' ■

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. आपले लेखन प्रसिद्ध झालेला अंक आमच्याकडून दर महिन्यात अवश्य पाठवला जातोच. मात्र काही वेळा निवासी पत्त्यात झालेला बदल, अपूर्ण पत्ता यांमुळे आपल्याकडे पाठवलेला अंक परत येतो. याकरिता शक्यतो लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती.

तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

आमचा पत्ता : पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**